# वसई-विरार शहर महानगरपालिका
## पाणीपुरवठा विभाग, मुख्यालय

दि.१६/०४/२०२४

**<u>प्रेसनोट</u>**

वसई-विरार शहर महानगरपालिकेस सुर्या टप्पा-१ व ३ या योजनेतुन २०० द.ल.ली. प्रतिदिन पाणी उपलब्ध होत असून महानगरपालिकेस मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या ४०३ द.ल.ली. पाणी पुरवठा योजनेतून १७० द.ल.ली. पाण्यापैकी ८० ते ९० द.ल.ली. पाणी उपलब्ध होत आहे. अतिरिक्त पाणी उपलब्ध होण्याच्या अनुषंगाने काशिदकोपर MBR येथे सुर्या योजनेतील मुख्य जलवाहिनीस शुक्रवार दि.१९/०४/२०२४ रोजी जोडणीचे काम करावयाचे आहे.

तरी उपरोक्त कामाकरीता सुर्या टप्पा-१ व टप्पा-३ सह मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या सुर्या योजनेतून होणारा संपूर्ण पाणीपुरवठा दि. १९/०४/२०२४ रोजी सकाळी ९.०० वाजता ते दि.२०/०४/२०२४ रोजी दुपारी ३.०० वाजेपर्यंत असा ३० तास बंद ठेवण्यात येणार आहे. त्यानंतर पाणी पुरवठा सुरु झाल्यानंतर पुढील २ दिवस अपुऱ्या दाबाने शहरास पाणी पुरवठा होणार आहे. नागरीकांनी उपलब्ध पाणी जपुन वापरावे व महापालिकेस सहकार्य करावे हि विनंती.

पाणीपुरवठा विभाग
वसई विरार शहर महानगरपालिका